**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (पुर्व),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
**दिनांक :** २९/०८/२०२५

## रमाबाई अपार्टमेंट दुर्घटनेतील जखमींची रुग्णालयात जावून मा.पालकमंत्र्यांनी घेतली भेट; दुर्घटनाग्रस्तांना सर्वोतोपरी मदत करण्याचे प्रशासनाला दिले आदेश

वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती सी मधील नारंगी रोड, विरार (पूर्व) येथील रमाबाई अपार्टमेंट या इमारतीचा मागील भाग कोसळून झालेल्या दुर्घटनेतील जखमींना आज पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना.श्री.गणेश नाईक यांनी प्रकृती हॉस्पिटल, बोळींज, विरार पश्चिम येथे जाऊन भेट घेतली व त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. जखमींना आवश्यक ते सर्व वैद्यकीय उपचार देण्याचे आदेश यावेळी मा.पालकमंत्र्यांनी प्रशासनाला दिले.
सदर दुर्घटनेबाबत महानगरपालिका मुख्यालयात मा.पालकमंत्री यांच्या अध्यक्षेतखाली बैठक घेण्यात आली. बैठकीत मा.आयुक्त श्री.मनोजकुमार सूर्यवंशी यांनी झालेल्या दुर्घटनेविषयी व बचाव कार्याबाबत माहिती दिली.
बैठकीत मा.पालकमंत्री यांनी झालेल्या दुर्दैवी घटनेबाबत धोकादायक इमारतींवर तात्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले.
दुर्घटना ठिकाणी महापालिका प्रशासन, NDRF टीम, महसूल विभागाचे कर्मचारी, पोलीस वा अग्निशमन व वैद्यकीय विभाग यांनी तात्काळ आवश्यक त्या उपाययोजना केल्याबाबत मा.पालकमंत्री महोदयांनी प्रशासनाचे कौतुक केले.
दुर्घटनेत जखमी झालेल्यांना तसेच मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांना शासनाकडून योग्य ती आर्थिक मदत मिळवून देण्याबाबत वरिष्ठ स्तरावर कळविण्यात आल्याचे यावेळी मा.पालकमंत्री महोदयांनी सांगितले.
वसई विरार मनपा क्षेत्रात असलेल्या अजून १४१ धोकादायक इमारतीमधील रहिवाशांना म्हाडाच्या इमारतींमध्ये राहण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्याबाबत कॅबिनेटच्या बैठकीत प्रस्ताव सादर करणार असल्याचे मा.पालकमंत्री महोदयांनी सांगितले.